# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## लक्ष्मी पूजनाची सभा

प्रिय बंधू भगिनीनो / मातांनो,

वरील संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे "श्री लक्ष्मीपूजनचा" कार्यक्रम रविवार दिनांक 25 ऑक्टोबर 1992 रोजी सायंकाळी ठीक 5:00 वाजता श्री मधूकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डींग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे खोलीवर आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून लक्ष्मीपुजनाच्या कार्यक्रमास शोभा आणावी, हि नम्र विनंती.

सभेपुढील कामे – श्री लक्ष्मी पूजन

आपला

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

**<u>विशेष सूचना</u>**
यावर्षी देखील इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा संस्थेचा विचार आहे. त्यावेळी सर्व सभासदांनी आपल्या पाल्याचे मार्कस अथवा मार्कलिस्टची झेरॉक्स प्रत संस्थेच्या पदाधिकारी / कार्यकारीणीचे सदस्य यांचेकडे दिनांक 15 नोव्हेंबर 1992 पर्यंत पोहोचविण्याची कृपा करावी, हि विनंती.

# फळसेवाडी हितकारी संस्था
## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : रविवार 25 ऑक्टोबर 1992
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डिंग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री वासुदेव बाबू राणे | 11. श्री उत्तम वामन राणे |
| 2. श्री मधुसूदन श्रीधर राणे | 12. श्री प्रभाकर श्रीधर राणे |
| 3. श्री साबाजी त्रिंबक राणे | 13. श्री श्रीधर आत्माराम राणे |
| 4. श्री दत्ताराम विष्णु साटम | 14. श्री मधुकर संभाजी राणे |
| 5. श्री सुरेश रघुनाथ राणे | 15. श्री उदय भगवान राणे |
| 6. श्री एकनाथ अनंत राणे | 16. श्री अनंत नारायण राणे |
| 7. श्री रमेश रघुनाथ राणे | 17. श्री धोंडू रघुनाथ राणे |
| 8. श्री सत्यविजय शिवराम राणे | 18. श्री संतोष श्रीधर राणे |
| 9. श्री दिलीप मधुकर राणे | 19. श्री सुनिल सदानंद राणे |
| 10. श्री शिवाजी त्रिंबक राणे | |

उपरोक्त संस्थेची बैठक लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने श्री मधुकर संभाजी राणे यांच्या घरी अभ्युदयनगर, बिल्डींग 13, काळाचौकी, मुंबई – 400 033 याठिकाणी आयोजित करण्यात आलेली होती. वरील 19 सभासद या बैठकीस उपस्थित होते. चिटणीसांनी ठिक 6:00 वाजता सभेस सुरवात केली.

सभेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष काही अपरिहार्य कारणांने अनुपस्थित असल्याने कार्यकारी अध्यक्ष म्हणून जेष्ठ सभासद श्री वासुदेव बाबू राणे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. नंतर विषयपत्रिकेप्रमाणे लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम असल्याने श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी श्री पूजन करावे असे ठरले व श्री दत्ताराम विष्णु साटम यांच्या हस्ते श्री लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम पार पडला.

तत्पूर्वी चिटणीसांनी दोन गोष्टींचा उल्लेख केला की या संस्थेचे धडाडीचे कार्यकर्ते श्री भगवान नाना राणे यांचे देहवसान बुधवार दिनांक 21ऑक्टोबर 1992 रोजी झाले. तरी आपण सर्व त्यांच्या कुटूंबियांच्या दुःख:त सहभागी आहोत.

दुसरी गोष्ट आपल्या संस्थेचे धडाडीचे कार्यकर्ते व तळमळीचे शिक्षक श्री साबाजी त्रिंबक राणे यांना उत्कृष्ट शिक्षकाचा राष्टीय पुरस्कार मिळाला त्याबद्दल संस्थेला अत्यंत आनंद झालेला आहे. त्यांच्या आयुष्यात असेच वारंवार यश येवो अशी परमेश्वराकडे प्रार्थना केली.

विषय पत्रिकेवर नसताना खालील विषयांवर संस्थेने जी कामे केली त्याबद्दल सांगितले.

- दिनांक 12 जानेवारी 1992 जे संमेलन साजरे केले त्या सहकार्याबद्दल आभार मानले.

- वाडीतील रस्त्यावर दिवाबत्तीची सोय याबद्दल चिटणीसांनी असे सांगितले की ही बाब सध्या ग्रामपंचायत पिसेकामते यांच्याकडे सुपूर्द केलेली आहे, लवकरच निर्णय होईल अशी आशा.
- फळसेवाडी शाळा क्रमांक 2 या ठिकाणी एस टी पिकअप शेड उभारण्याबाबत – या बाबतीत आपल्याला जमीन उपलब्ध करून द्यावी लागेल व आमदार श्री नारायण रावराणे यांना भेटावयास लागेल.
- रास्ता वाढविण्यासाठी व वनीकरणासाठी ज्या ग्रामस्थांच्या रस्त्यालगतच्या जमिनी गेल्या आहेत त्याबद्दल जोरदार चळवळ करावी लागेल.
- फळसेवाडी येथे नविन विहीर खोदाईचे काम करणे याबद्दल चिटणीसांनी अशी माहिती दिली कि विहीरीसाठी पाणी सर्व्हेअर मशीनने (जवळजवळ रु.1500/- खर्च) सर्व्हे केला असता असे आढळून आले की विहीरीसाठी एकही जागा उपलब्ध नाही व बोअरवेलला जवळजवळ 60 मीटर खोदाई केल्यावरच पाणी मिळू शकेल त्यामुळे त्याच्या पाण्याचा पुरेसा दाब मिळणार नाही व ही योजना फार खर्चिक स्वरुपाची आहे त्यावेळी आपण नळयोजना आमदार श्री नारायणराव राणे यांच्या बोअरवेलवर राबविण्यात येणार आहे त्यासाठी प्रयत्न करावे. तसे प्रयत्न चालूही आहेत असे चिटणीसांनी सांगितले. त्यामध्ये कार्यकारी अध्यक्ष म्हणाले संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप राणे हे एकदा भेटले होते त्यावेळी त्यांना त्यांच्या घराकडे बोअरवेल पडते म्हणून कोणीतरी सभासद विरोध करतो म्हणून विहीरीचा प्रयत्न सोडला आहे हि गोष्ट खरी आहे का ? असा चिटणीसांना सवाल केला. त्यावेळी चिटणीसांनी असा खुलासा दिला की अश्या तऱ्हेचा विहीर अथवा पाणी योजना बंद करण्याबद्दल प्रस्ताव नाही. सभासदाचे नाव मात्र कार्यकारी अध्यक्षांनी शेवटपर्यत सांगितले नाही.
- रोजगार हमी योजने अंर्तगत फळसेवाडी ते बौध्दवाडी पर्यत (पिसेकामते) रस्ता मिळणेबाबत याबाबत सरकारी योजनेमार्फत कारवाई अजुनही चालू आहे असे चिटणीसांनी सांगितले.

फळसेवाडी शाळा क्रमांक 2 च्या विविध समस्या व सुधारणाबाबत देखील चर्चा झाली. या ठिकाणी जे दोन प्रस्ताव आले की शाळा जिल्हा परिषदेस भाडेतत्वावर देणे अथवा पूर्णपणे हस्तांतर करणे. याबाबतीत चिटणीसांनी आवश्यक माहीती पूरवीली. त्यावेळी असे ठरले की हा विषय विशेष – रेग्युलर सर्वसाधारण सभेसमोर ठेवावा व त्याप्रमाणे निर्णय घ्यावा. चिटणीसांनी ही माहिती पूरविली की गेले दोन वर्षे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तके, गणवेश इत्यांदिंचे वाटप होते त्याप्रमाणे यावर्षी देखील करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी श्री गोसावी साहेब हे उपस्थित होते त्यांनी शाळेबद्दल गौरव उद्गार काढले.

शाळेची जमीन तयार करावयाची आहे ती बहूतेक यंदा मे महीण्यात होईल. गेल्यावर्षी शाळेत जी 'श्री सत्यनारायण पूजा व सरस्वतीपूजन' कार्यक्रम झाला त्यावेळी रंगरंगोटी देखील केली गेली, त्याबद्दल संस्थेने कार्यकर्त्यांचे आभार मानले. तसेच इतर सुधारणाबद्दल विशेष सर्वसाधारण सभेत हा शाळेचा विषय घ्यावा असे ठरले.

सर्वात महत्वाचा मुद्दा आला तो 'ब्राह्मण मंदिर अथवा चौथरा उभारण्याबाबत चिटणीसांनी श्री वामन राजाराम राणे यांचे पत्र या विषयाबाबत गावाहून आले त्याची माहीती सभासदांस दिली व त्याबद्दलच्या खर्चाचीही माहीती सांगितली. या विषयावर श्री सुरेश रघुनाथ राणे व श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी चर्चेत विषेश सहभाग दिला. मुद्दा असा होता की मंदिराबाबत गावची मर्यादा श्री लिंगेश्वर यांच्याकडे विचारणा करून त्या देवतेची परवानगी मिळाली का ? तसेच त्या ब्राम्हणदेवतेची पुन्हा प्रतिस्थापना ब्राम्हणाच्या मदतीने लघुरुद्र वगैरे करून करावी लागेल का ? या सर्व मुद्यांची चर्चा झाली व हा विषय सर्वसाधारण सभेपुढे चिटणीसांनी ठेवावा अशी विनंती केली. चिटणीसांनी असे सांगितले की मी श्री वामन राजाराम राणे यांच्याकडून माहीती घेतो.

यावेळी रु.330/-  इतकी वार्षिक वर्गणी गोळा करण्यात आली. अकाऊंटींग वर्ष जानेवारी 1992 ते मार्च 1993 असे ठरविण्यात आले. अश्या तऱ्हेने सर्व चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

चिटणीसांनी या प्रसंगी अध्यक्ष पद सभांळण्याबद्दल संस्थेचे वयोवृध्द सभासद श्री वासुदेव बाबू राणे यांचे आभार मानले. 'श्री' च्या पुजेचे काम श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी पार पाडल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच घरमालक श्री मधुकर स राणे यांनी या दिवशी चहापाणी व इतर सुविधा मिळवून दिल्या तसेच जागा उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे व कुटुंबियांचे आभार मानले. तसेच चिटणीसांनी दिवाळीचा घरोघरी सण असून जे सभासदबंधू उपस्थित राहिले त्यांचे पुन्हा एकवार आभार मानले व ही सभा सायंकाळी 7:30 वाजता संपल्याचे घोषित केले.

---

| | |
|---|---|
| श्री सुनिल सदानंद राणे | श्री वासूदेव बाबू राणे |
| चिटणीस | अध्यक्ष |